रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माण देशी महिला सहकारी बँक लि., म्हसवड

ता. माण, जि. सातारा




" उद्योजिका महिलांच्या आर्थिक सुविधेची
डिजिटल बँकिंग सेवा माण देशी महिला बँकेची "

**२३ वा**
**वार्षिक अहवाल**
**सन २०१९-२०२०**

**ऑडीट वर्ग 'अ'**

माण देशी
बँक

# संचालक मंडळ (सन २०१६-१७ ते २०२१-२२)


श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)


सौ. ललीता सा. पोळ
उपाध्यक्षा (देवापूर)


सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)


सौ. राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)


सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)


सौ. राणी वि. बनगर
संचालिका (म्हसवड)


सौ. रोहिणी ता. बाड
संचालिका (पर्यंती)


सौ. सत्यभामा बा. खाडे
संचालिका (पळशी)


सौ. रेखा अ. कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)


सौ. रोहिणी प्र. कारंडे
संचालिका (दहिवडी)


सौ. अश्विनी वि. पवार
संचालिका (उंबर्डे)


सौ. सुवर्णादेवी न. पाटील
संचालिका (सातारा)


श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु.।।)


सौ. दिपाली गवळी
तज्ञ संचालिका (कोल्हापूर)


सौ. रेखा कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी



मुंबई येथे माण देशी महोत्सव २०२० चे उद्घाटन मा. डॉ. निलमताई गोऱ्हे, उपाध्यक्षा विधान परिषद महाराष्ट्र राज्य, श्री. सुरेंद्र रोशा, ग्रुप जनरल मॅनेजर मुख्य कार्यकारी अधिकारी, भारत एच.एस.बी.सी., श्रीमती अलोका मजुमदार, वरिष्ठ विकास अधिकारी एच.एस.बी.सी., श्री. सुधीर शेनॉय, सी.ई.ओ. डाव केमिकल कंपनी



सातारा येथे ''माण देशी महोत्सव २०१९'' चे उद्घाटनप्रसंगी प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी सौ. संगीता अग्रवाल सी. ए., पुणे श्रीमती चंदाताई निमकर, संचालक पशुसंवर्धन विभाग निंबकर कृषी संशोधन संस्था फलटण व माण देशी बँकेच्या संचालिका



मॅरेथॉनमध्ये सहभागी विद्यार्थ्यांसमवेत चेतना सिन्हा व प्रभात सिन्हा.

पुढारी

## मॅरेथॉनमध्ये दिव्यांग मुलांची धाव

**म्हसवड : प्रतिनिधी**

निराधार विलास गेंड व सचिन तुपे या दिव्यांग मुलांनी मुंबई येथे झालेल्या मॅरेथॉनमध्ये सहभागी होत आपल्या जिद्दीचा प्रत्यय आणून दिला. या मॅरेथॉनमध्ये या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी माणदेशी फाऊंडेशनच्या चेतना सिन्हा व माणदेशी चॅम्पियन्सचे अध्यक्ष प्रभात सिन्हा हेही धावले. यांनी एकत्रित १० किमीची मॅरेथॉन ९३ मी १० सेकंदात पूर्ण केली.

मुंबई येथे झालेल्या टाटा मॅरेथॉनला दोनशेहून अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते. तसेच ५५ हजाराहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. माण तालुक्यात अत्यंत हलाकीच्या परिस्थितीत वाढलेल्या विलास व सचिन यांना या मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याची संधी श्रीमती चेतना सिन्हा यांच्यामुळे मिळाली.

या स्पर्धेत दिव्यांग व्यक्तींसोबत मोठ मोठ्या संस्थांचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहभाग घेऊन त्यांना नवी दिशा देण्याचे अनमोल कार्य केले. विलास गेंड आणि सचिन तुपे हि दोन दिव्यांग मुले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक संचालित माण देशी अभ्यासकेंद्रात बी ए भाग-३ मध्ये शिकत आहेत. या विद्यार्थ्यांनी आपल्या शारिरीक व्याधीवर मात करत पुणे येथील नवजीवन अंध संस्थेत संगणक प्रशिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.




दि. १५ फेब्रुवारी २०२१ रोजी माण देशी महिला सहकारी बँकेच्या शाखा गोंदवले व शाखा दहिवडी येथे एटीएम सुविधा सुरु करण्यात आली.




सन २०१८-२०१९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ''गट कर्ज वाटप योजना'' व ''आठवडा बाजार कर्ज योजना'' यामधील कर्जदार व सहकर्जदारांचा विमा उतरविला जातो. या योजनेअंतर्गत विमा धारक महिलेस धनादेश देताना

## BRICS Women's Business Alliance (India Chapter)



**Sangita Reddy**
JMD, Apollo Hospitals
Chairperson, Indian Chapter BRICS WBA



**Falguni Nayar**
Founder & CEO
Nykaa



**Pallavi Shroff**
Managing Partner
Shardul Amarchand Mangaldas



**Chetna Sinha**
Founder & Chairperson
Mann Deshi Bank



**Mallika Srinivasan**
CMD
TAFE

**ब्रिक्स (BRICS) बँक म्हणजे ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका या पाच देशांच्या सभासदांची मिळून एक बँक आहे. त्यामध्ये आर्थिक विकास कमिटीचे ''अध्यक्षपद'' श्रीमती चेतना सिन्हा यांना मिळाले आहे.**

## माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड ता. माण जि. सातारा

रजि.नं.-एस.ए.टी./माण/बी.एन.के./ओ./११९,सन१९९६ दि.३१/१०/९६

# तेवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

माण देशी महिला सह.बँक लि.म्हसवड बँकेच्या सर्व सभासदांना विनंतीपुर्वक कळविणेत येते की, आपल्या बँकेची तेवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २७ मार्च २०२१ रोजी दुपारी १२ वाजता माण देशी महिला सहकारी बँक लि.म्हसवडच्या मुख्य कार्यालय, माण देशी चौक, म्हसवड ४१५५०९ येथे बँकेच्या अध्यक्षा मा.चेतना सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली दूरचित्रवाणीद्वारे(व्हिडीओ कॉन्फरन्स) ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. तरी पाठविलेल्या लिंकच्या माध्यमातून आपण सभेत सहभागी व्हावे, हि नम्र विनंती.

**• सभेपुढील विषय •**

१. दि. १४/०९/२०१९ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२० अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून स्वीकृत करणे.
३. दि. ३१ मार्च २०२० अखेरच्या मा.संचालक मंडळाने मंजुर केलेल्या नफा विभागणीस कार्योत्तर मंजुरी देणे
४. सन २०२०-२०२१ सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०१९-२०२० मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५. सन २०१९-२०२० चे शासकीय लेखापरीक्षण अहवाल व त्याचा दोष दुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
६. मा.संचालक मंडळाने सन २०२०-२०२१ करिता नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास कार्योत्तर मंजुरी देणे.
७. मा. संचालक मंडळाने सन २०२०-२०२१ करिता नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास कार्योत्तर मंजुरी देणे.
८. मा. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले पोट नियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१०. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

स्थळ :- म्हसवड
दिनांक:०५ मार्च, २०२१

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

(सौ. रेखा सु. कुलकर्णी)
मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सुचना :-**

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. बँकेचा सन २०१९-२०२० अखेरचा लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद, नफा तोटा पत्रक व लेखापरीक्षक प्रमाणपत्र दिनांक २८ सप्टेंबर २०१९ रोजीच्या ''दैनिक ऐक्य '' मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.
३. बँकेचा ३१.०३.२०२० अखेरचा २३ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालय व सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर तसेच बँकेच्या वेबसाईट www.manndeshibank.com वर प्रसिद्ध करण्यात आला आहे. तरी सभासदांना विनंती की, प्रसिद्ध केलेला अहवाल नजीकच्या शाखेत अथवा वेबसाईटवर पहावा.
४. ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल तर त्यांनी आपल्या सुचना बँकेचा ईमेल आय डी info@manndeshibank.com यावर दि. २० मार्च २०२१ पुर्वी बँकेकडे पाठवाव्यात.
५. कोविड १९ या वैश्विक महामारीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या दि.२५.०२.२०२१ च्या परिपत्रकान्वये सदर सभा दूरचित्रवाणीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्स) ऑनलाईन पद्धतीने घेण्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वरीलप्रमाणे आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दुरचित्रवाणीद्वारे(व्हिडीओ कॉन्फरन्स) ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली आहे.
६. या दूरचित्रवाणीद्वारे(व्हिडीओ कॉन्फरन्स) ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची दिनांक, वेळ याबातची माहिती एसएमएस/ईमेल/व्हाट्सअॅप द्वारेही कळविण्यात येईल.
७. ज्या सभासदांनी आपला ईमेल आय डी, मोबाईल नंबर बँकेकडे कळविलेला नाही त्या सभासदांनी त्याची माहिती बँकेच्या ईमेल आय डी info@manndeshibank.com व ग्राहक सुविधा क्रमांक ९४२३८०७८९४ या वर एसएमएस/व्हॉट्सअॅप द्वारे दि. २४ मार्च २०२१ पर्यंत पाठविण्यात यावे.
८. वर नमुद मुद्दा क्र.७ व्यतिरिक्त, आपणास सदर दूरचित्रवाणी(व्हिडीओ कॉन्फरन्स) ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या सभेची नोटीस प्राप्त होताच आपण आपला मोबाईल क्रमांक, ईमेल आय डी रजिस्टर केल्याची खातरजमा करावी, नसल्यास आपण आपली माहिती आपल्या ओळखपत्रासह, सभासद प्रमाणपत्र किंवा सभेची नोटीस सोबत घेवून आपल्या नजिकच्या शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत व सार्वजनिक सुट्या वगळता दि.२४मार्च २०२१ पर्यंत समक्ष येवून आपले नाव, मोबाईल नंबर व ईमेल आय डी यासह रजिस्टर करु शकता.
९. वरीलप्रमाणे बँकेकडे रजिस्टर असलेल्या व नव्याने रजिस्टर झालेल्या सर्व सभासदांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर व ईमेल आय डी वर दूरचित्रवाणीद्वारे(व्हिडीओ कॉन्फरन्स) ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभेची लिंक २५ मार्च २०२१ पासून पुढे सभेपूर्वी पाठविले जाईल.
१०. बँकेच्या ज्या सभासदांनी या पुर्वी आपले ईमेल आय डी, मोबाईल नंबर रजिस्टर केले असतील त्या सभासदांना त्यावर वार्षिक सभेची लिंक पाठविली जाईल. जर सभासदांनी आपल्या मेल आई डी, मोबाईल नंबर बदलला असलेस तो मेलद्वारे/एसएमएस द्वारे किंवा प्रत्यक्ष नजिकच्या शाखेत जावून अपडेट करावा.
११. कृपया प्रस्तुतच्या नोटीसचे सभासदांनी काळजीपुर्वक वाचन करावे. सभेत डिजीटल पद्धतीने सभेतील ठरावांवर मतदान घेण्यात येईल.

## सन्माननीय सभासद व भगिनींना माझा नमस्कार....

मला खात्री आहे की, आपण सर्वजण निरोगी व सुरक्षित आहात. गेले पुर्ण वर्षभर आपण फार मोठ्या आव्हानाची परिस्थिती अनुभवली आहे. कोरोना सारख्या महामारीने सर्व जगाला व्यापलं आहे, म्हणुनच सर्व सभासद व त्यांच्या कुटुंबीयांच्या बाबतीत माझी अशी अपेक्षा की, ''आपण योग्य ती काळजी घ्यावी व निरोगी रहावं.''

२०२० आपल्या सर्वांसाठी आव्हानात्मक गेले आहे. त्या परिस्थितीमध्ये सुद्धा माण देशी महिला बँकेने आपल्या ग्राहकांसाठी निरनिराळे उपक्रम राबविले. गेल्या वर्षी २३ मार्च २०२० ला कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन झाल्यानंतर सर्व जगच थांबले होते. अशा परिस्थिती मध्ये माण देशी बँक व माण देशी फौंडेशनच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविले. लॉकडाऊन झाल्या नंतरही माण देशीचे सभासद व ग्राहक खूप कष्टाने छोटे-छोटे व्यवसाय उभे करुन त्यामधून थोडी थोडी बचत करत होते. परंतु अशा विपरित परिस्थिती मध्ये व्यवसाय बंद झाले ज्या लोकांचे पोट हातावर होते त्यांना जीवनावश्यक वस्तुंसुद्धा उपलब्ध होत नव्हत्या. अशा कुटुंबांसाठी माण देशी बँकेने त्वरीत १५ दिवसाच्या रेशनची सुविधा उपलब्ध करुन दिली. आम्हाला याची जाणीव आहे की, या सुविधेने प्रश्न सुटणार नाही. पण पुढे काय व कसे करायचे ? या प्रश्नाची उत्तरे मिळण्यासाठी पोटभर अन्न मिळणे गरजेचे होते. त्यासाठीच माण देशीने ठरविले की, ज्यांची फार बिकट परिस्थिती आहे त्यांच्यासाठी मदत व्हावी म्हणून जीवनावश्यक वस्तूंचे किटवाटप चालू केले. त्याचबरोबर बँकेने सोने तारण कर्जाचा व्याजदर कमी केला, कारण बऱ्याच लोकांच्या घरातील जिव्हाळ्याची लोकं आजारी पडली तर त्यांना दवाखान्यातील उपचाराचे पैसे सहज उपलब्ध व्हावेत म्हणून सोनेतारणाचा व्याजदर कमी करुन तो ८ टक्के केला. या सुविधेमुळे ही गोष्ट लक्षात आली की, सोनेतारण कर्जाचा बऱ्याच ग्राहकांना या बिकट परिस्थितीमध्ये मोठा फायदा घेता आला.म्हणूनच तर **''सोनं श्रीमंताचा श्रृंगार,पण गरिबांचा आधार.. ''**

दुसरे अभिमानाने सांगावेसे वाटते की, अशा लॉकडाऊच्या परिस्थितीमध्ये, सर्वत्र सरकारने घालून दिलेल्या नियमानुसार कामकाजाच्या वेळे मध्ये कपात करण्यात आल्या होत्या. अशा अडी अडचणीच्या वेळी माण देशीची शाखा उघडी आहे किंवा नाही, लोकांना लॉकडाऊन मुळे बाहेर कुठे जाता येईल की नाही ? यासाठी माण देशी च्या शाखांमध्ये जेथे जेथे एटीएम होते, ती सुविधा २४ तास चालू ठेवण्यात आली. त्याच बरोबर एटीएम मध्ये पैसे कमी पडणार नाहीत याची योग्य काळजी घेतली गेली. त्यात आपल्या भागातील लोकं छोट्या नोटांचा वापर करतात. त्यासाठी एटीम मधून मिळणारी रक्कम छोट्या नोटांच्या स्वरुपात ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यात आली. **'' माझी बचत माझी पुंजी ''**

कोव्हीड २०१९ काळामध्ये माण देशी महिला बँकेच्या सभासद व कर्ज घेवून व्यवसाय उभं करणाऱ्या, गाई-म्हशी घेणाऱ्या महिला या महिलांनी विविध स्तरावर ऑनलाईन वेबिनार मध्ये भाग घेतला आणि त्यांनी आपले अनुभव/भाषणे सुद्धा सादर केली. माण सारख्या ग्रामीण भागातील महिला छोटे-छोटे व्यवसाय करतात, आशा सेविका म्हणून काम करतात पण त्यांच्या वेबिनारमधील भाषणाला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. कोव्हिड काळात सामान्य व्यक्तिसुद्धा तंत्रज्ञानाचा वार करायला धडपडत होते, पण त्याच वेळी माण देशीच्या महिला, सभासद, कर्जदार, ठेविदार या महिला बिनधास्त पणे ऑनलाईन झूमद्वारे भाषणे देत होत्या.
माझा त्या सर्व महिलांना सलाम! म्हणूनच तर **'' सभासद मी माण देशीची, बँक माझी हक्काची..... ''**

माण देशीच्या माध्यमातून महिला टेलरिंगचा व्यवसाय करत होत्या, लॉकडाऊन काळात सर्व व्यवसाय बंद झाल्यामुळे या महिलांनी पर्याय काढला व त्यांच्याकडे जे कापड शिल्लक होते त्याचे मास्क बनवून रस्त्यावर विकले. माण देशी उद्योजिका रुपाली पावणीकर या महिलेने तर हजारो मास्कचा पुरवठा करुन समाज कार्य केलेच पण कितीतरी महिलांना ऑनलाईन, व्हाट्सअॅपद्वारे प्रशिक्षण सुद्धा दिले. त्यांनी **''मी मालकीण माझ्या उद्योगाची...''** हे पटवून दिले आहे.

आज मला अभिमान वाटतो की, जवळजवळ या माण देशी महिलांनी १३ लाख मास्क बनविले आणि महामारीच्या काळात उपयोगी पडणारी लोकांची गरज पुर्ण केली. माण देशी फौंडेशन व माण देशी बँकेने एकत्रित काम करुन सिपला फौंडेशनच्या सहकार्यातून मास्क बनवण्याचे केंद्रच चालू केले आहे. महिलांनी बनवलेले मास्क मेडिकल, एमआयडीसी, सरकारी ऑफिस, सरकारी हॉस्पिटल यांनी खरेदी केले. यावरुन माण देशी महिलांची मजल किती मोठी !'' कि अशा बिकट परिस्थितीमध्ये सुद्धा त्यांनी स्वत:चे जग उभे केले '' म्हणूनच त्या म्हणतात **'' माझे धाडसच माझे भांडवल आहे.''**

मला अधिक आनंद या गोष्टीचा होत आहे की,**'' माण देशी महिला बँक पुर्णपणे डिजीटल झालेली आहे.''** त्यामार्फत कितीतरी माण देशी महिला डिजीटल बँकिंग व्यवहार करतात. आणखी विशेष म्हणजे माण देशी महिला बँक लवकरच २५ व्या वर्षामध्ये पदार्पण करत आहे. महत्वाची बाब म्हणजे २५ व्या वर्षात आपण डिजिटल बँकिंग घेवून पाऊल टाकत आहोत, याचा मला सार्थ अभिमान आहे. माण देशी मार्फत **''डिजीटल दिदी ''** एटीएम बसद्वारे एटीएम, गुगल पे, ऑनलाईन पेमेंट, अशा अनेक प्रकारचे प्रशिक्षण देतात. लॉकडाऊनच्या काळात या प्रशिक्षणाचा महिलांना खूप फायदा झाला आहे. माण देशी महिलांनी आता डिजिटल दुनियेत पदार्पण केले आहे. **'' उद्योजिका महिलांच्या आर्थिक सुविधेची, डिजिटल बँकिंग सेवा माण देशी महिला बँकेची...''**

माण देशी ग्रामीण भागातील महिला बँक आहे, सर्व कर्मचारी स्थानिक आहेत. माण देशी महिला बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त अधिकारी, शाखाधिकारी, वसुली अधिकारी किंवा महिला कर्मचारी यांनी कोव्हिड काळात कामाचे योग्य नियोजन केले या कुठेही कमी पडल्या नाहीत. तसेच बँकेच्या मिटिंगसुद्धा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. रेखा कुलकर्णी व मुख्य वित्त अधिकारी सौ. सुषमा शेंडगे या वेगवेगळ्या व्यासपीठावर म्हणजेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, वैकुंठ मेहता इन्स्टिटयुट, एनआयबीएम सारख्या ठिकाणी जावून माण देशीच्या कार्याची माहिती देतात.

'' ब्रीक्स'' (BRICS) म्हणजे ब्राझील, रशिया, भारत, चायना, साऊथ अफ्रिका या सगळ्या देशाची मिळून एक बँक झालेली आहे. जी पाच देशाची वर्ल्ड बँक सारखीच बँक आहे. विशेष म्हणजे या ब्रीक्स बँकेचे यावर्षी भारताकडे अध्यक्षपद आहे. या ब्रीक्स बँकेची आर्थिक विकासाची जी कमिटी आहे. त्यामध्ये रशिया, चायना, ब्राझील, साऊथ आफ्रिका आणि भारत या देशांचे सभासदत्व आहेत. **त्या कमिटीचे ''अध्यक्षपद'' ही मला मिळाले आहे, एका अर्थी माण देशी महिलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधीत्व मिळाले आहे.** माण देशी बँकेच्या सर्व सभासद, ठेविदार, खातेदार व कर्जदारांनी आपले जे अनमोन योगदान दिले अशाच सहकार्याची अपेक्षा बँकेला आपल्याकडून यापुढे देखील आहे.

आपली स्नेहांकित,
श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा

# चालू वर्षातील घडामोडी

माण देशी महिला सहकारी बँकेने २४ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दुष्काळी माण तालुक्यातील कष्टकरी महिलांच्या आर्थिक सबलीकरणाच्या प्रमुख उद्देशाने चेतना सिन्हा यांनी माण देशी महिला सहकारी बँकेची स्थापना केली. कारण महिला सक्षम झाल्यानंतर देश सक्षम होईल. या कार्यामुळे गेल्या तेवीस वर्षाच्या कालखंडात माण देशी महिलांना खऱ्या अर्थाने सक्षमीकरणाची चालना मिळू शकली.

सन २०१९-२० ची विशेष बाब म्हणजे, माण देशी महिला बँकेने ई कॉमर्स बँकिंग सुरु केले आहे. चालू आर्थिक वर्षात बँकेच्या म्हसवड, धायरी, सातारा, कामोठे, दहिवडी, गोंदवले शाखेमध्ये एटीएम मशिन सेवा सुरु केली आहे. पुढील वर्षात बॅंकिंग व्यवहार डिजीटल पद्धतीने करण्याचा बँकेचा संकल्प आहे.

रुपे डेबिट कार्ड, एटीएम सेवा आपल्या शाखांमध्ये सुरु आहे. बँकेच्या ग्राहकांना रुपेकार्ड वापरण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबरोबरच आठवडे बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी हे कार्ड वापरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे ग्राहकांना त्यांच्या दारात म्हणजेच व्यवसायाच्या ठिकाणी एटीएमच्या माध्यमातून सेवा पुरविण्याची सोय निर्माण झाली आहे. याबरोबरच माण देशी बँकेने आरटीजीएस, एनईएफटी व एसएमएस बँकिंगसारख्या सुविधा देखील सुरु आहेत.

## बँकेने ग्राहकांसाठी उपलब्ध केलेल्या सेवा:

**१. कोअर बँकिंग:** बँकेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब केला असून बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी एसएमएस बँकींगची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्या ग्राहकांनी बँककडे आपल्या मोबाईल नंबरची नोंदणी केली अशा सर्व ग्राहकांना त्यांच्या खात्यावरील प्रत्येक व्यवहाराच्या नोंदी एसएमएस द्वारे कळविल्या जातात.

**२. UPI (यूनिफाईड पेमेंट इंटरफेस)**- भीम युपीआय, गुगल पे, फोन पे, पेटीएम द्वारे, क्षणार्धात रक्कम वर्ग करणेची सुविधा.(ऑनलाईन खरेदी, बिल भरणा, मोबाईल रिचार्ज इत्यादी)
UPI QR Code द्वारे दुकानदार, पेट्रोल पंप, व्यवसाय, भागीदारी संस्था यांना पैसे स्वीकारण्याची सुविधा.

**३. रुपे डेबीट कार्ड:** बँकेने अत्याधुनिक मायक्रो एटीएम मशीन व रुपे डेबीट कार्ड च्या सहाय्याने आठवडा बाजारात बसून व्यवसाय करणाऱ्या महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणीच सर्व आर्थिक व्यवहार करता यावेत याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. बँकेने ईएमव्ही रुपे डेबीट कार्ड व विक्री केंद्र (POS) सेवा सुरु केली आहे. याद्वारे ग्राहकांना शॉपींग मॉल्स, पेट्रोल पंप, हॉटेल्स्, इन्शुरन्स इ. ठिकाणी रुपे कार्ड द्वारे पेमेंट करणे शक्य आहे. बँकेने रुपे कार्ड अंतर्गत ग्राहकांना एटीएमची २४x७ सुविधा उपलब्ध करुन दिली असून देशांतर्गत इतर कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढणे शक्य झाले आहे.

**४. ए.टी.एम. सुविधा:** माण देशी बँकेने शाखा म्हसवड, शाखा सातारा, शाखा धायरी, शाखा कामोठे (नवी मुंबई), दहिवडी, व गोंदवले बु ।।, अंतर्गत माण देशी बँकेची On site ए.टी.एम. सुविधा सुरु केली आहे.

**५. मोबाईल बँकिंग लायसेन्स व आय एम पी एस सुविधा:** माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड आता IMPS (Immediate Payment Service) सुविधे सहित, ज्या द्वारे ग्राहक पुढील सुविधांचा लाभ घेऊ शकतात १) त्वरीत एका खात्यामधून दुसऱ्या खात्यामध्ये पैसे पाठविणे. २) मिनी स्टेटमेंट ३) चेक बुक साठी पाठविणे. ४) या सुविधा द्वारे केलेल्या शेवटच्या ०५ व्यवहारांची माहिती मिळविणे.

**६. मोबाईल बँक कलेक्शन सिस्टिम अॅप:**- आता माण देशी बँकेमध्ये मोबाईल अॅप्लीकेशनद्वारे टेक्नोस्पायर टेक्नॉलॉजीस् च्या Mobile Bank collection System(BCS) ची सुविधा सुरु करण्यात आली. आपण हे अॅप

अॅण्ड्रॉईड मोबाईलमध्ये घेऊन ते माण देशी बँकेमधून अॅक्टिवेट करुन दैनंदिन collection किंवा वेगवेगळ्या बचत खात्यामध्ये Online अथवा offline या दोन्ही मोडमध्ये काम करु शकता व पैसे जमा करु शकता. तसेच बिझनेस करस्पोडंटस् हे अॅप अगदी सहज हाताळू शकतात. यामध्ये आपण बचत खात्यांमध्ये बँकेच्या अधिकृत एजंट (Business correspondent Agent) द्वारे पैसे भरु शकता.

**७. BBPS(भारत बील पेमंट सिस्टिम)**- हि सुविधा देखील नव्याने सुरु करण्यात आली आहे. या माध्यमातून सर्व प्रकारची बिले भरण्याची सुविधा त्याच बरोबर (Value added services) मोबाईल अॅपद्वारे कोणताही मोबाईल अथवा DTH रिजार्च करता येते.

**८. APBS (आधार पेमंट बिल सिस्टिम)**- या योजनेमुळे शासनाअंतर्गत मिळणाऱ्या सर्व सबसिडी साठी माण देशी महिला बँकेच्या खातेदारांना महिला बँकेचाच खाते नंबर देता येणार आहे. म्हणजेच सर्व सबसिडी महिला बँकेच्या खात्यावर जमा होऊ शकते.

**९. एस एम एस सुविधा**- पैशाचा व्यवहार झाल्यानंतर बँकेच्या ग्राहकांना त्यांच्या खात्याला नोंद असलेल्या मोबाईल नंबर वरती त्वरीत SMS जातो व छोट्या वायरलेस Thermal printer द्वारे पैसे जमा केलेल्याची पावती देखील भेटते.

**१०. आय.एफ.एस.कोडः** बँकेचा आय.एफ.एस.कोड YESB0MAN001 असून तो प्रत्येक चेकवर तसेच पासबुकवर नमूद आहे. या कोडद्वारे बँकेच्या खातेदारास देशांतर्गत कोणत्याही बँकेकडून रक्कम आपल्या बँकेतील खात्यावर थेट जमा करता येईल.

**११. आरटीजीएस व एनईएफटीः** बँकेने इनवर्ड व आऊटवर्ड आरटीजीएस व एनईएफटीची सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन दिली आहे. आऊटवर्ड आरटीजीएसने देशांतर्गत कोणत्याही बँकेच्या खात्यात आपल्या बँकेच्या खात्यातील रक्कम ट्रान्सफर करता येईल व इनवर्ड आरटीजीएसच्या माध्यमातून रक्कम स्विकारली जाईल.

**१२. सीटीएस क्लिअरींग सुविधाः** बँकेने ग्राहकांना सीटीएस क्लिअरींगची सुविधा उपलब्ध करुन दिली असून या प्रणाली अंतर्गत देशातील कोणत्याही शहरातील चेकची रक्कम (जर संबंधित बँक सीटीएस क्लिअरींगची मेंबर असलेस) दुसऱ्या दिवशी संबंधीत खातेदाराच्या खात्यात थेट जमा केली जाते.

**१३. पॅन कार्डः** बँकेने आपल्या ग्राहकांसाठी नवीन पॅन कार्ड काढणेची सुविधा उपलब्ध करुन दिली असून ज्यांना पॅन कार्ड काढावयाचे असेल त्यांनी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

**१४. वीज बीलः** बँकेच्या शाखांमध्ये वीज बील स्वीकारण्याची सोय उपलब्ध आहे.

**१५. ई-स्टेटमेंटः** ई-स्टेटमेंट सुविधेद्वारे खातेदारांना रजिस्टर असलेल्या ईमेल आय डी वरती महिन्यातून एकदा, तिमाही, अर्धवार्षिक, वार्षिक, दररोज किंवा आठवड्यातून एकदा असे खात्याचे स्टेटमेंट मिळू शकते.

**१६. ई-कॉमर्स सुविधाः** रूपे डेबिट कार्ड च्या सहाय्याने आता आपण इंटरनेट च्या युगात वेळ व कष्ट वाचवून घर बसल्या कोणत्याही वस्तूची खरेदी करु शकतो. वीज बील, फोन बील अथवा कोणत्याही प्रकारचे बील रांगेमध्ये उभे न रहाता मिनिटासरशी भरु शकतो. डिश टिव्ही, मोबाईल रिचार्ज देखील करु शकतो.

# २३ वा वार्षिक अहवाल सन २०१९-२०

## भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. १० कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. ७७६.८२ लाख एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलात रु. ८६.०३ लाख इतकी वाढ झालेली असून ही वाढ १२.४५ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण ४२२० नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे १६५२ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या ३०७२३ झाली आहे.

## गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. २५५.२२ लाख होती. अहवाल वर्षात त्यात रु. ४०.९६ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी,राखीव निधीची रक्कम रु. २९६.१८ लाख इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण १६.०५ % इतके आहे.

## ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१९ च्या ठेवी रु. १०८४४.४७ लाखावरुन मार्च २०२० अखेर रु. ११००१.६५ लाख एवढ्या झाल्या आहेत. ही वाढ रु. १५७.१८ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण १.४५% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे. सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC) अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम डी.आय.सी. जी.सी. (DICGC) कडे बँक भरते.

## कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु. ६९८२.३२ लाख इतके होते या वर्षी त्या मध्ये रु. २२२.०० लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. एकूण कर्ज मार्च २०२० अखेर ७२०४.३२ लाख एवढे असून कर्ज वाढीचे प्रमाण ३.१८ % आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणून त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

## अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ४०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१९-२०२० सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९५.६३% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना ९१.९०% कर्जवाटप केले आहे.

## थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण ५.०४% इतके आहे व वसुली ९७.९२% झाली आहे. व NPA चे प्रमाण २.०८% आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

सदरचा तपशील (महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७५ (२) प्रमाणे ) पा.नं. -१९ वर उपलब्ध आहे.

**नफा वाटणी :-**२०१९-२० या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| चालू सालचा नफा | ८२४०७९६.३३ |
|---|---|
| तपशील | रक्कम |
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | २०६०१९९.०८ |
| इमारत निधी (५०% प्रमाणे) | ४१२०३९८.१७ |
| गुंतवणूक चढउतार निधी (२५% प्रमाणे) | २०६०१९९.०८ |
| एकूण | ८२४०७९६.३३ |

## शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

## सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २५% २) ओ.बी.सी. - १२% ३) एन्. टी. ७% ४) ओपन - ५६%

## गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/०३/२०२० या वर्षात रु. ३९८१.७७ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक ३१६९.४१ लाख व इतर बँकेमध्ये ८१२.३६ लाख अशी गुंतवणूक केलेली आहे.

## अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/०३/२०२० अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण सी. ए. संगीता अग्रवाल, बी.आर.एम.ए.एस. ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौटंटस्, पुणे यांनी केले असून त्यांनी बँकेस बहुमोल सूचना व मार्गदर्शन केले आहे.

## प्रशिक्षण कार्यक्रम:-

दरवर्षीप्रमाणे सन २०१९-२० मध्ये माण देशी बँकेद्वारे संचालक व कर्मचाऱ्यांना कर्ज, वसुली, गट कर्ज वाटप, कॅशिअर, बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय खालील विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

| अ. क्र. | प्रशिक्षण विषय | प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १. | म.स.संस्था अधिनियम १९६० चे ''कलम १५६'' मध्ये सतत होणारे बदल,वापराचे अधिकार व अंमलबजावतील अडचणी याबाबतचे प्रशिक्षण | श्री. प्रसन्न नारायणे व<br>सौ. रुक्साना मुलाणी<br>Recovery Officer | डॉ. विठ्ठलराव विखे पाटील<br>सहकारी प्रबंध संस्थान, पुणे |
| २. | टि.डि.एस.(TDS)१५ एच/१५ जी सबमिशन प्रशिक्षण | शाहीन मोकाशी, अकौंटंट | डॉ. विठ्ठलराव विखे पाटील<br>सहकारी प्रबंध संस्थान, पुणे |
| ३. | आय.टि व सायबर सेक्युरिटी प्रशिक्षण | सर्व बँक कर्मचारी | श्री. विजय भालेराव<br>आय.एस.ऑडिटर<br>युनिसॉफ्ट कॉम्प्युट्रेड प्रा.लि. |
| ४. | डिस्प्युट मॅनेजमेंट सिस्टिम(DMS) भारत क्लिअरिंग सेटलमेंट(BCS) व GST प्रोसेस या साठीचे प्रशिक्षण | श्री अमर चौगुले<br>आय. टि. ऑफिसर | भारतीय राष्ट्रीय भुगतान निगम<br>(NPCI) |
| ५. | शहरी सहकारी बँक सी.ई.ओ.साठी रेग्युलेटरी, ऑपरेशनल व मॅनेजमेंट इश्युजचे प्रशिक्षण | सौ. रेखा कुलकर्णी, CEO | कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर<br>बँकींग(CAB), आरबीआय, पुणे |
| ६. | शहरी सहकारी बँक अधिकारी यांच्या साठी इंटर्नल इन्स्पेक्शन आणि ऑडिट, आर बी. आय. इन्स्पेक्शन आणि कम्प्लायन्सचे प्रशिक्षण | सौ. सुषमा शेंडगे, CFO<br>सौ. वैशाली शेडगे, Internal Auditor<br>सौ. स्मिता प्रकाश टकले<br>Branch Manager (Vaduj) | कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर<br>बँकींग(CAB), आरबीआय, पुणे |
| ७. | ए.आय.आर./एस. एफ. टि. (स्टेटमेंट ऑफ फायनांशियल ट्रान्सॅक्शन) भरणे संदर्भातील नियमावलींमध्ये होणारे बदल यासाठीचे प्रशिक्षण | श्री. अमर चौगुले<br>आय. टि. ऑफिसर | कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स<br>सहकारी असोसिएशन लि. |

## बँकेची वैशिष्ट्ये

* व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
* आर.टी.जी.एस.,एन.ई.एफ.टी. व एस.एम.एस.ई स्टेटमेंट बँकींग सेवा उपलब्ध.
* रुपये ५ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
* महिलांसाठी UTI पेन्शन योजना
* आठवडे बाजार करणाऱ्या व जे.एल.जी. कर्जदार महिलांसाठी आर्युविमा संरक्षण.
* महिलांच्या नावावर स्थावर मालमत्ता असल्यास व्याजदरात १% सूट
* नवीन पॅनकार्ड काढण्याची सुविधा
* यु पी आयची सुविधा
* चेक ट्रंकेशन सिस्टिम(सी.टी.एस.)
* ए.टी.एम. मशीन व रुपे डेबीटकार्डच्या साहाय्याने आर्थिक व्यवहार
* वीजबीले स्विकारण्याची सोय
* आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.
* जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
* व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.

वरील सर्व बँकिंग सुविधा देणारी माण देशी ही पहिलीच महिला बँक आहे. या सर्व सुविधा माण देशीच्या म्हसवड,गोंदवले, दहिवडी, वडूज, लोणंद, सातारा, धायरी पुणे व कामोठे-नवी मुंबई या ठिकाणच्या शाखांमधून सर्व ग्राहकांना दिल्या जात आहेत.

## ठेवीचे व्याजदर

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव ३% | ३६६ दिवस ते ४५६ दिवस ६.००% |
| १५ दिवस ते ४५ दिवस ३.००% | ४५७ दिवस ते ५ वर्षापर्यंत ६.००% |
| ४६ दिवस ते ९० दिवस ३.२५% | दामदिडपट ठेव-४ वर्षे ९ महिने २६ दिवस |
| ९१ दिवस ते १८० दिवस ३.५०% | दामदुप्पट ठेव -८ वर्षे ३ महिने |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस ६.००% | ५ वर्षाच्या पुढे - ६ % |

* जेष्ठ नागरिक ०.५% जादा व्याजदर

## बँकेचा शाखा विस्तार

| | |
|---|---|
| शाखा म्हसवड फोन: (०२३७३) २७०११९ | शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४ |
| शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७० | शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८० |
| शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२ | शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९० |
| शाखा धायरी, पुणे फोन: (०२०) २४६९०३८८ | शाखा कामोठे फोन:(०२२)२७४३०००१ |

**शाखा म्हसवड, वडूज, गोंदवले व कामोठे येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे.**

### * बँकर्स *

| | |
|---|---|
| दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुंबई | बँक ऑफ इंडिया शाखा - बुध,दहिवडी |
| सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा | आय.डी.बी.आय म्हसवड, राणंद, लोणंद, पुणे |
| बँक ऑफ बडोदा, दहिवडी | एस.बी.आय. वडुज, दहिवडी, ॲक्सीस बँक सातारा |
| बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड, गोंदवले बु।। | यस बँक, पुणे |

**शासकीय लेखापरिक्षक**
के.जी.बी.ॲण्ड जे.असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्,कोल्हापूर

**कायदेशीर सल्लागार**
ॲड. भोईटे विलासराव एन.(सातारा)
ॲड. काझी एन. एच.(म्हसवड)
ॲड. अभिजीत भोसले (कोल्हापूर)
ॲड. सुशील वे पाटील(कोल्हापूर)

**अंतर्गत लेखापरिक्षक**
सी. ए. संगीता अग्रवाल भागीदार
बी.आर.एम.ए.एस. ॲण्ड असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्, पुणे

# लेखापरीक्षण अहवाल

प्रति,
मा. सभासद
माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड
ता. माण जि. सातारा

संदर्भ: आपले नियुक्ती पत्र क्र. मुख्य कार्यालय- १४०/०९/२०१९ दि. १६.०९.२०१९

१. आम्ही माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१.०३.२०२० च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा/तोटा पत्रकाचे आणि रोख जमा खर्च पत्रकाचे तसेच सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरिक्षण केले आहे. आर्थिक वर्ष ०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० या कालावधीच्या आर्थिक पत्रकांमध्ये आम्ही लेखापरिक्षण केलेल्या ८ शाखा व मुख्य कार्यालय यांच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे.

## व्यवस्थापनाची आर्थिक पत्रकांबाबतची जबाबदारी

२. बॅकेच्या व्यवस्थापनाची हि जबाबदारी आहे की आर्थिक पत्रके हि बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट १९४९, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे, महाराष्ट्र सहकारी संस्था निबंधक यांची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० भारतामध्ये सर्वसामान्य असणारी अकौंटिंग तत्वे,यांना अनुसरुन बनविली जातील ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही बँकेच्या आर्थिक स्थितीची सत्य व रास्त स्थिती दर्शवितील. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदि बाबींचा समावेश होतो की, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही चुका अथवा गैरव्यवहार यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर दोषांपासून मुक्त राहतील.

## लेखापरिक्षकांची जबाबदारी

३. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकांवर मत नोंदविण्याची आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे दि इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटींग स्टॅन्डर्डस्ना अनुसरुन केलेले आहे. या स्टॅन्डर्डनुसार आम्ही नितीतत्वांचे अनुपालन करणे तसेच लेखापरीक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की, जेणे करुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली जाईल.

४. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संर्दभातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होतो. लेखापरिक्षणाच्या पद्धतीची निवड ही लेखापरिक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यामुळे गंभीर दोष निर्माण होण्याच्या शक्यतेची पडताळणी आदी बाबी गृहित धरुन केली जाते. अशा जोखमींची पडताळणी करुन योग्य अशी लेखापरिक्षण पद्धती निवडताना लेखापरिक्षक प्रामुख्याने बँकेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पद्धती विचारात घेतात. परंतु ही पद्धती बँकेच्या अंतर्गत नियंत्रण प्रणालीच्या प्रभावीपणाबद्दल मत व्यक्त करण्याकरीता निवडली जात नाही. लेखापरिक्षणामध्ये, व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौंटिंग तत्वांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करणे, याचा सुद्धा समावेश होतो.

५. आमचा विश्वास असा आहे की, आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेले पुरावे आम्हाला आमचे लेखापरिक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देतात.

अभिमत

६. आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब, त्या सोबतची टिपणे व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठे आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे यांना अनुसरुन बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९, महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा रिझर्व्ह बँकेच्या तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था निबंधक यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौंटींग तत्वांचे अनुपालन करतात आणि

अ. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१.०३.२०२० च्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीची,

ब. नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची आणि

क. रोख जमा खर्च पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या रोख रक्कमेच्या प्रवाहाची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

७. सदर बँकेचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकामधील नमुना 'अ' व 'ब' हे अनुक्रमे हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या परिशिष्ठ तीन तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदींना अनुसरुन तयार केले आहेत.

८. परिच्छेद क्र. १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षण पद्धती आणि मुख्य व शाखा अहवालातील भाग अ, ब आणि क मध्ये नमुद केलेल्या शेऱ्यास अनुसरुन तसेच आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन आणि बँकेने सादर केलेल्या हिशोब व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठ यांना अनुसरुन आम्ही अहवाल करतो की,

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते समाधानकारक आहेत.

२) आमच्या मते, लेखापरिक्षणा दरम्यान तपासलेली सर्व हिशोब पुस्तके कायद्यानुसार बँकेने ठेवलेली आहेत तसेच लेखापरिक्षणाच्या दृष्टीने शाखांकडून प्राप्त झालेली विवरणे पुरेशी आहेत.

३) आमच्या दृष्टीपतास आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अधिकारक्षेत्रास अधिन राहून केलेले आहेत.

४) बँकेचा ताळेबंद तसेच नफा तोटा पत्रक हे बँकेची हिशोब पुस्तके व विवरण पत्रे यांना अनुसरुन केलेली आहेत.

५) बँकेने अबलंबलेली अकौंटिंग स्टॅन्डर्डस् (अकौंटिंग स्टॅन्डर्डस् २२ वगळता) ही भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौंटिंग तत्वांना अनुसरुन केलेली आहेत.

९. आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरण आणि हिशोब पुस्तके व इतर रेकॉर्ड तपासणी करताना महाराष्ट्र सहकारी नियम १९६१ मधील कलम ६९(६) मध्ये नोंदवलेल्या बाबींबाबत दखलघेण्याजोगे व्यवहार आढळून आलेले नाहीत.

१०. तसेच आम्ही अहवाल करतो की,

**आर्थिक वर्ष २०१९-२०२० करिता संस्थेस वर्ग "अ" देण्यात आलेला आहे.**

के. जी.बी. ॲण्ड जे असोसिएटस् करिता
चार्टर्ड अकौटंटस्
फर्म.रजि.क्र.११४८४९W

संतोष तासे
भागिदार
लेखापरिक्षक नामतालिका क्र.१००५०
मेंबरशीप क्र.१०८९२५
UDIN No:-20108925AAAADV7600

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २६.०९.२०२०

# माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड ता. माण

## बँकेची प्रगती

| अ. क्र. | तपशील | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | ११३६६ | ११८७१ | १२२२० | १४०५३ | १७१७३ | २२७०१ | २५८३२ | २४९७८ | २६०८५ | २८१५५ | ३०७२३ |
| | | | | | | | | | | | | ₹ लाखात |
| १ | भागभांडवल | २२३.४२ | २६०.०६ | २७६.५३ | ३०८.८१ | ३८४.६७ | ४७०.०० | ५१७.३७ | ५४३.७० | ६०९.३० | ६९०.७९ | ७७६.८२ |
| २ | एकूण ठेवी | २७२१.५६ | ३३३८.२५ | ४०००.०० | ४८०१.१९ | ६३९८.०० | ७६३३.२९ | ८७८२.०७ | ८९४२.०० | ९७५२.४१ | १०८४४.४७ | ११००१.६५ |
| ३ | एकूण कर्जवाटप | १४४२.१४ | २२४०.९९ | २६४१.८३ | २८५३.५९ | ३९५०.३७ | ५३१८.४८ | ५१९९.५२ | ५६८५.९३ | ६४१३.१२ | ६९८२.३२ | ७२०४.३१ |
| ४ | गुंतवणूक | १०२९.९३ | ८३९.६१ | ११९१.३३ | १७८७.३५ | २२९२.३९ | २२४१.४७ | ३४४०.७३ | ३०१०.९४ | ३४३१.७५ | ४०११.३२ | ३९८१.७७ |
| ५ | खेळते भांडवल | ३०८४.५३ | ३७३३.१५ | ४४९१.३१ | ५३७०.५३ | ७१५१.१४ | ८६३०.८७ | ९८७२.९७ | १०१७०.२१ | ११११४७.९५ | १२४१५.९७ | १२८४७.५५ |

## परिशिष्ट 'अ'

| | |
|---|---|
| १) बँकेचे नांव | :- माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड |
| २) मुख्य कार्यालयाचा पत्ता | :- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९ |
| ३) नोंदणी क्रमांक व तारीख | :- एस. ए. टी.(माण)/बी.एन.के.(ओ)/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६ |
| ४) रिझर्व बँक परवाना क्रमांक व तारीख | :- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी ,२७/१/१९९७ |
| ५) कार्यक्षेत्र | :- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे,कोल्हापूर जिल्हे |

## दि. ३१/०३/२०२० रोजीची आर्थिक स्थिती

(रक्कम ₹ लाखात )

| | | |
|---|---|---|
| शाखा-मुख्यालय | | ८ |
| सभासद | १. अ वर्ग | ३०७२३ |
| | २. ब वर्ग | ५८३० |
| वसुल भागभांडवल | | ७७६.८२ |
| राखीव व इतर निधी | | ₹ ६६२.२८ |
| ठेवी (₹११००१.६५) | अ) बचत ठेव | ₹१६५५.४२ |
| | ब) चालू ठेव | ३२०.९४ |
| | क) मुदत ठेव | ₹९०२५.२९ |
| कर्जे( ₹७२०४.३२) | अ) तारणी | ₹ ३८४३.४१ |
| | ब) बिनतारणी | ₹ ३३६०.९१ |
| | क) अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा टक्केवारी | ९५.६३% |
| | ड) दुर्बल घटक कर्जपुरवठा टक्केवारी | ९१.९०% |
| बाहेरील कर्जे | | ₹०.०० |
| गुंतवणूक ( ₹ ३९८१.७७) | सातारा डी.सी.सी.बँक लि. | ₹४५.६१ |
| | शासकीय मान्यताप्राप्त रोखे | ₹ ३१६९.४१ |
| | इतर | ₹ ७६६.७५ |
| थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण | | ५.०४% |
| ऑडीटवर्ग | | 'अ' |
| नफा | | ₹ ८२.४१ |
| एकूण कर्मचारी | | ७८ |
| खेळते भांडवल | | ₹१२८४७.५५ |

## रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र. ५२ दि. २५.०३.२०१४ नुसार बँकांनी ताळेबंद सोबत द्यावी लागणारी माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१९ | ३१/०३/२० | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १ | **भांडवल पर्याप्तता (शेकडा प्रमाण)** | १६.३६% | १७.८१% | १.४५% |
| २ | **भांडवल निधी तपशील** | | | |
| | टायर- १ निधी | १०५२.८१ | १२२२.२१ | १६९.४० |
| | टायर -२ निधी | ७९.५१ | ८३.६० | ४.०९ |
| | **एकूण निधी** | **११३२.३२** | **१३०५.८१** | **१७३.४९** |
| | एकूण जोखीम मालमत्ता | **६९२३.०७** | **७३३१.८३** | **४०८.७६** |
| ३ | **भांडवल निधीचे जोखीम मालमत्तेशी प्रमाण** | | | |
| | टायर- १ निधी | १५.२१% | १६.६७% | १.४६% |
| | टायर -२ निधी | १.१५% | १.१४% | -०.०१% |
| | **एकूण निधी** | **१६.३६%** | **१७.८१%** | **१.४५%** |
| | गुंतवणूक व त्यांचे मुल्यांकन | | | |
| ४ | **अ. एस.एल.आर गुंतवणूक** | | | |
| | १. सरकारी कर्जरोखे | २८८९.२२ | ३१६९.४१ | २८०.१९ |
| | **एकूण** | **२८८९.२२** | **३१६९.४१** | **२८०.१९** |
| | **ब. बँक व इतर गुंतवणूक** | | | |
| | १. राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांतील ठेवी | ९१९.०५ | ७६६.७० | -१५२.३५ |
| | २. डी.सी.सी.बँक ठेव | २०२.९९ | ४५.६१ | -१५७.३८ |
| | **एकूण** | **११२२.०४** | **८१२.३१** | **-३०९.७३** |
| | **क. शेअर्समधील गुंतवणूक** (एम.एस.सी.बँक,डी.सी.सी.बँक, बँक असो.) | ०.०५ | ०.०५ | ००.० |
| | **एकूण (अ+ब+क)** | **४०११.३१** | **३९८१.७७** | **-२९.५४** |
| | **ड. मुल्यांकन** | | | |
| | १. दर्शनी किंमत | २९५५.५० | ३२२५.५० | २७०.०० |
| | २. पुस्तकी किंमत | २८८९.२२ | ३१६९.४१ | २८०.१९ |
| | ३. बाजारभावाने होणारी किंमत | २८६७.६० | ३२४६.२२ | ३७८.६२ |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१९ | ३१/०३/२० | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | **ई. उत्पादनक्षमता नसलेली गुंतवणूक तपशील** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | **घरकुल, बांधकाम, व्यवसायासाठी दिलेल्या कर्जाचा तपशील** | | | |
| | १. बांधकाम व्यवसायिक यांना दिलेले कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. घरकुल व दुरुस्तीअंतर्गत दिलेले कर्ज | ५६२.२१ | १२०७.६३ | ६४५.४२ |
| | **एकूण** | **५६२.२१** | **१२०७.६३** | **६४५.४२** |
| ६ | **शेअर्स व डिबेंचरर्स तारणावर दिलेली कर्जे** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | **संचालक नातेवाईक यांना दिलेली कर्जे** | **०.००** | **०.००** | **००.००** |
| | फंडबेस कर्जाचा तपशील | ०.२० | २०.०८ | १९.८८ |
| | नॉन फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | **ठेवीचा सरासरी व्याजदर** | **७.८३%** | **७.३८%** | **-०.४५%** |
| ९ | **एन.पी.ए. चा तपशील** | | | |
| | अ. ढोबळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | ३.३२% | ४.७८% | १.४६% |
| | ब. निव्वळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | १.७२% | २.०८% | ०.३६% |
| १० | **एन.पी.ए. मुव्हमेंट** | | | |
| | आरंभीची एन.पी.ए. रक्कम | २७१.८५ | २३१.६९ | -४०.१६ |
| | + चालु वर्षातील एन.पी.ए. खाती | २२१.९३ | १७०.१२ | -५१.८१ |
| | - चालु वर्षातील वसुलीची रक्कम | २६२.०९ | ५७.३२ | -२०४.७७ |
| | शिल्लक एन.पी.ए. रक्कम | **२३१.६९** | **३४४.४९** | **११२.८०** |
| ११ | **एन.पी.ए. वर्गीकरणानुसार वसुलीचा तपशील** | | | |
| | सब स्टॅन्डर्ड | १३१.५७ | ३४.१० | -९७.४७ |
| | डाऊटफुल एक वर्षापर्यंत | ४९.२८ | ७.१५ | -४२.१३ |
| | डाऊटफुल एक ते दोन वर्षापर्यंत | ३९.५९ | १६.०२ | -२३.५७ |
| | डाऊटफुल तीन वर्षापर्यंत | ४१.६५ | ०.०५ | -४१.६० |
| | **एकूण एन.पी.ए.** | **२६२.०९** | **५७.३२** | **-२०४.७७** |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१९ | ३१/०३/२० | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १२ | **एन.पी.ए. तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | १४३.४७ | ११३.७७ | -२९.७० |
| | + चालु वर्षातील तरतूद | -२९.७० | ८५.१६ | ११४.८६ |
| | **एकूण तरतूद** | **११३.७७** | **१९८.९३** | **८५.१६** |
| १३ | **स्टॅन्डर्ड ॲसेट तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | २६.४७ | २९.६७ | ३.२० |
| | + चालु वर्षातील तरतूद | ३.२० | ०.७५ | -२.४५ |
| | **एकूण तरतूद** | **२९.६७** | **३०.४२** | **०.७५** |
| १४ | **नॉन परफॉर्मींग गुंतवणूकीपोटी केलेल्या तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभची तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **०.००** | **०.००** |
| १५ | **गुंतवणूक चढउतार निधी** | | | |
| | आरंभीची तरतूद | २३.८४ | ३६.३४ | १२.५० |
| | + चालु वर्षातील वाढ व तरतूद | १२.५० | १२.६६ | ०.१६ |
| | **एकूण तरतूद** | **३६.३४** | **४९.००** | **१२.६६** |
| १६ | **गुंतवणूक,घसारा निधीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | ०.०० | १०.७५ | १०.७५ |
| | + चालु वर्षातील तरतूद | १०.७५ | ०.०० | -१०.७५ |
| | **एकूण तरतूद** | **१०.७५** | **१०.७५** | **०.००** |
| १७ | **खेळत्या भांडवलाशी** | | | |
| | १. मिळालेल्या व्याजाचे शेकडा प्रमाण | १०.९९% | ११.०३% | ०.०४% |
| | २. इतर उत्पनाचे शेकडा प्रमाण | १.४३% | १.०३% | -०.४०% |
| | ३. ढोबळ नफ्याचे शेकडा प्रमाण | १.१३% | १.३१% | ०.१८% |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१९ | ३१/०३/२० | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | ४. निव्वळ नफ्याचे शेकडा प्रमाण | ०.८२% | ०.६४% | -०.१८% |
| | ५. व्यवस्थापकीय खर्चाचे शेकडा प्रमाण | ५.०९% | ५.०४% | -०.०५% |
| | ६. प्रती सेवक व्यवसाय | २२२.८३ | २३३.४१ | १०.५८ |
| | ७. प्रती सेवक नफा | १.२७ | १.०६ | -०.२१ |
| १८ | **परकीय चलनामधील व्यवहाराची माहीती** | लागू नाही | | |
| १९ | **रिझर्व्ह बँकेने पेनल्टी आकारली असल्यास त्याचा तपशील** | लागू नाही | | |
| २० | **रिस्ट्रक्चर केलेल्या कर्ज खात्यांचा तपशील** | **घरकुल कर्जे** | **एस.एम.ई.कर्जे** | **इतर कर्जे** |
| | अ. स्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ब. सबस्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | क. डॉऊटफुल रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण (अ+ ब + क) | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २१ | **बँकेच्या स्थावर मालमत्तेचे पुनर्मुल्यांकन केले असल्यास त्याचा तपशील** | | | |

## 22.i) Composition of National & Co-operative Investment

| Sr. No | Issuer | Amount | Extent of below Investment grade Securities | Extent of unrated Securities | Extent of unlisted Securities |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | PSUs | -- | -- | -- | -- |
| 2 | FIs | -- | -- | -- | -- |
| 3 | Public Sector Banks | | | | |
| | 1) State Bank Of India | 420.77 | | | |
| | 2) IDBI Bank Ltd. | 201.12 | | | |
| | 3) Bank of Maharashtra | 100.84 | | | |
| | 4) Bank of Baroda | 0.00 | | | |
| | Total | 722.73 | | | |
| 4 | Mutual Funds | 3.97 | -- | -- | -- |
